




# ध्येयप्राप्तीसाठी अभ्यासात सातत्य ठेवावे

## ▶गुणवंतांच्या सत्कार कार्यक्रमात प्राचार्य डॉ. गव्हाणे यांचे प्रतिपादन

**शिरुर अनंतपाळ** : स्वतःमध्ये आत्मविश्वास असल्याशिवाय यश प्राप्त होत नाही. आत्मविश्वास नसेल तर तुम्ही कोणत्याही परिक्षेत यशस्वी होणार नाहीत. त्यामुळे आपले इप्सीत ध्येय साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवणे आवश्यक असल्यांचे मत राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी व्यक्त केले.शिरूर अनंतपाळ शहरातील शिवनेरी महाविद्यालयात दि. २२ जुलै रोजी आयोजित गुणवंत विद्यार्थाचा गुणगौरव कार्यकृमात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड विश्वंभरराव माने हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, संस्था सचिव पदमाकर मोगरगे, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. हरिचंद्र चौधरी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एन. पवार, उपप्राचार्य प्रा. सूर्यवंशी उपस्थित होते. पुढे बोलताना गव्हाणे म्हणाले की विद्यार्थ्यांनी चांगली स्वप्न पाहिली पाहिजेत. स्वप्न चांगले असतील तर चांगलेच फळ मिळते, असे सांगत मोठे स्वप्न पाहणे हे व्यक्तीच्या यशाचा गुरुमंत्र असल्याचे ते म्हणाले . इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांचा पीएच.डी.प्राप्त केल्याबद्दल सत्कार करण्यात आला

प्रास्ताविक रसायनशास्त्र विभागाचे प्रा. प्रशांत कुमदाळे यांनी केले. सूत्रसंचलन डॉ.ओम जाधव यांनी केले.तर अध्यक्षीय समारोप ॲड. विश्वंभरराव माने यांनी केला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी, पालक व शिक्षण प्रेमी उपस्थित होते.

**Merit Listed Students Appreciation Programme**